# मेट्रो-३ ची भुयारी चाचणी सुरू

। मुंबई : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारी मार्गादरम्यान मेट्रो प्रोटोटाइप ट्रेनच्या चाचण्या सुरू करण्यात आल्या असून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने समाजमाध्यमांवर व्हिडीओ जाहीर केला आहे. हा व्हिडीओ जाहीर केल्यानंतर अनेकांनी मेट्रो मार्गिकेतून प्रवास करण्याची इच्छा व्यक्त केली.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने अर्थात एमएमआरसीएलने रविवारी मेट्रोच्या भुयारी प्रवासाचा व्हिडीओ जारी केला. हा व्हिडीओ जारी करतानाच स्मार्ट एलईडी लायटिंग प्रणालीमुळे उर्जेचा वापर कमी होईल, असे सांगण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी मेट्रोचे भुयारीकरण पूर्ण झाल्याचे अधिकृतरीत्या एमएमआरसीएलने जाहीर केले होते.

आरे सारीपूत नगर येथे उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या कारडेपोमध्ये प्रोटोटाईप ट्रेनच्या चार्जिंगची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. ३० ऑगस्टपासून मेट्रो मार्गिकेच्या चाचण्यांना मुख्यमंत्र्यांनी हिरवा कंदील दाखविला असून रेल्वेचे सुरक्षा प्रमाणपत्र व अन्य प्रमाणपत्र मिळाल्यावरच मेट्रो-३ चा पहिला टप्पा सर्वसामान्यांच्या सेवेत दाखल होणार आहे.